माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**दाखल झालेले अपील**

## क्र. मुमाआ/नों.क्र.२११३६२/२१/अ.क्र.५८४०/२४/०१

**श्री. विजय शंकर यादव**
ए-७/५०३, वैभव सी.एच.एस.लि. आनंद नगर,
सी.एस.रोड, दहिसर (पू.), मुंबई-४०० ०६८.
**विरुद्ध**
**जन माहिती अधिकारी तथा वसाहत अधिकारी के/पूर्व विभाग,**
४०४, ४ था मजला, गुंदवली, गावठण,
आझाद रोड, अंधेरी (पू.) मुंबई-४०० ०६९.
**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त के/पूर्व विभाग,**
४०४, ४ था मजला, गुंदवली, गावठण,
आझाद रोड, अंधेरी (पू.) मुंबई-४०० ०६९.

**<u>व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २६.१२.२०२४</u>**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | अनुपस्थित. ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे नोटीस दि. ०९.१२.२०२४ रोजी प्राप्त झाली आहे. |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपीलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| ०७.१२.२०१९ | १९.१२.२०१९ | २६.१२.२०१९ | - |

अपिलकर्तांनी जन माहिती अधिकारी यांचे दि.१९.१२.२०१९ रोजीचे उत्तर संलग्न करुन दि.२४.०३.२०२१ रोजी आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केले आहे.

अपिलकर्तांनी माहिती अर्ज दि. ०७.१२.२०१९ अन्वये "गुमास्ता लायसन नंबर ०९७२७९ बाबत माहितीची मागणी केलेली आहे.

जन माहिती अधिकारींनी दि. १९.१२.२०१९ रोजी "अपीलार्थी यांनी मागणी केलेली माहिती कार्यालयातील अभिलेखात आढळून येत नाही", असे उत्तर दिले आहे.

जन माहिती अधिकारींनी उत्तराने समाधान न झाल्यामुळे प्रथम अपिल अर्ज दि. २६.१२.२०१९ रोजी दाखल केला आहे.

अपिलकर्ता यांनी आयोगाकडे दि. २४.०३.२०२१ रोजी माहिती मिळाली नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपिल दाखल केले आहे.

आजच्या सुनावणीच्या वेळी अपीलार्थी यांना सुनावणी नोटीस प्राप्त झाली असून कोणतीही पूर्व सूचना न देता दुसऱ्यांना अनुपस्थित आहे. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ सुविधाकार (दुकाने व आस्थापना) प्र. के/पूर्व विभाग, श्री. विजयकुमार हनमाने उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ सुविधाकार (दुकाने व आस्थापना) यांनी आयोगास सादर केले की, त्यांच्या अभिलखावरुन प्रथम अपीलीय अधिकारी यांच्याकडे दि. २४.०१.२०२० व दि.२६.०२.२०२० रोजी सुनावणी ठेवण्यात आल्याचे दिसून येते बहुतेक तेव्हा कोविडमुळे सुनावणी आदेशाची प्रत प्राप्त झाली नसेल म्हणून प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि. २३.१२.२०२३ रोजी सुनावणी आयोजित केली व अपिलार्थी यांना कळविण्यात आले होते, परंतु सुनावणी दरम्यान अपिलार्थी अनुपस्थित होते.

जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ सुविधाकार (दुकाने व आस्थापना) यांनी आयोगास सादर केले की, आस्थापना नोंक्र ९७२७९ कार्यालयीन अभिलेखात आढळून येत नाही. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी जरी जन माहिती अधिकारी यांना माहिती अर्जाचे उत्तर विहित वेळेत दिले असले तरी सदर उत्तराची प्रत पुन:श्च देण्यात यावी असे आदेशित करुन अपील निकाली काढले आहे.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ सुविधाकार (दुकाने व आस्थापना) यांनी अपीलार्थी यांना माहिती देण्यात आली आहे.

सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**अपिल निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission Maharashtra

(हस्ताक्षर) 26-12-2024

**मुंबई**
**दिनांक :२६.१२.२०२४**

**( डॉ. प्रदीप व्यास )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**